सर्वोत्तम संस्थेसाठी कॅनडा येथील कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने सन्मानित

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,

गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक-४२२२२२

Ph. :0253-2230580, 2231715 http://ycmou.ac.in , http://ycmou.digitaluniversity.ac

E-mail : nondani@ycmou.digitaluniversity.ac

विद्यार्थी सेवा विभाग - नोंदणी कक्ष

जा. क्र. : नोंदणी /2025/ १७२ दिनांक : 22 जुलै 2025

सूचनापत्रक क्र. 2 /2025-26

बी.ए./ बी.कॉम. शिक्षणक्रमांच्या नोंदणी कालावधी संपलेल्या विद्यार्थ्यांसाठी पुनर्नोंदणी / पुनर्परीक्षेसाठी योजना

बी.ए (2000 Pattern) आणि बी.कॉम. (इंग्रजी व मराठी माध्यम) (2007 Pattern) या शिक्षणक्रमांचा आठ वर्षाचा नोंदणी कालावधी संपलेल्या विद्यार्थ्यांच्या पुनर्प्रवेश / पुनर्परीक्षेसाठी पुनर्नोंदणी करण्यासाठीचे नियम, पुनर्नोंदणी शुल्क आणि पुनर्नोंदणी प्रक्रिया खालीलप्रमाणे राहील

१) सदर पुनर्नोंदणी प्रक्रिया 2007 पासूनच्या 16 अंकी कायम नोंदणी क्रमांक असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी लागू राहील.

2) बी.ए (2000 Pattern) आणि बी.कॉम. (इंग्रजी व मराठी माध्यम) (2007 Pattern) या दोन्ही शिक्षणक्रमांचा आठ वर्षाचा कालावधी संपुष्टात आलेल्या विद्यार्थ्यांसाठी पुनर्नोंदणी शुल्क रु2000/-खाली तक्त्यात नमूद केलेल्या लिंकचा वापर करून ऑनलाईन पद्धतीने भरावयाचे आहे. सदर पुनर्प्रवेशाकरिता खालील तक्त्यात नमूद केलेली लिंक विद्यापीठाच्या https://ycmou.digitaluniversity.ac या संकेतस्थळाच्या होमपेजवर **Re-Registration (B.A./B.Com) या शीर्षकांतर्गत** उपलब्ध आहे.

अ. क्र	शिक्षणक्रम	माहितीचा तपशील	लिंक
01.	बी.ए./ बी.कॉम.	पुनर्नोंदणी शुल्क रु.2000 ऑनलाईन पद्धतीने भरण्यासाठी लिंक (विद्यार्थ्यांने पुनर्नोंदणी संदर्भातील आवश्यक सूचना वाचून नंतरच पुनर्नोंदणी शुल्क भरावयाचे आहे.)	https://ycmou.unisuite.in/t/48
02.	बी.ए./ बी.कॉम.	पुनर्नोंदणी शुल्क रु.2000 ऑनलाईन पद्धतीने भरल्यानंतर विद्यार्थ्यास प्राप्त होणारी शुल्क अदा केल्याची पावती या मेलवर पाठवावी.	re-registration@ycmou.ac.in

3) पुनर्नोंदणी शुल्क रु2000/- ऑनलाईन भरताना विद्यार्थ्याने आपली माहिती भरताना प्रवेश घेतलेल्या शिक्षणक्रमाच्या प्रवेशास आठ वर्ष पूर्ण झाली आहेत. याची खात्री करूनच पुनर्नोंदणी शुल्क भरावयाचे आहे.

4) पुनर्नोंदणी शुल्क रु2000/- ऑनलाईन भरतांना पुनर्नोंदणी पेजवर आवश्यक असणारी सर्व माहिती अचूकपणे भरणे अनिवार्य असेल.

5) विद्यापीठास अदा केलेले पुनर्नोंदणी शुल्क कोणत्याही कारणास्तव परत केले जाणार नाही. चुकीने भरलेले शुल्क हे दुसऱ्या विद्यार्थ्यासाठी वर्ग केले जाणार नाही. शुल्क भरण्याबाबतच्या सूचनेनुसार वरील लिंकवरून

सदरचे ऑनलाइन पेमेंट गेटवे वापरून क्रेडिट/डेबिट कार्ड/नेट बँकिंगद्वारे शुल्क भरावयाचे आहे. दिलेल्या लिंक व्यतिरिक्त इतर कुठल्याही लिंकवर भरलेले शुल्क ग्राह्य धरले जाणार नाही. त्यामुळे याची सर्वस्वी जबाबदारी विद्यार्थ्याची राहील.

पुनर्प्रवेश विद्यार्थ्यांकरिता :-

6) विद्यार्थ्याने पुनर्नोदणी शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरल्यानंतर त्यापुढील दोन कार्यालयीन दिवसान सदर विद्यार्थ्यास त्याच्या शिक्षणक्रमाच्या उर्वरित भागाची प्रवेश लिंक उपलब्ध होईल. नियमित विद्यार्थ्याप्रमाणे ऑनलाईन पद्धतीने प्रवेशप्रक्रिया पूर्ण करावयाची आहे.

7) पुनर्नोदणी शुल्क भरलेल्या विद्यार्थ्याने ऑनलाईन पद्धतीने प्रवेश अर्ज भरावयाचा आहे. अशा प्रवेशअर्जास नियमित विद्यार्थ्यासाठी लागू असणाऱ्या ऑनलाईन प्रवेशाबाबतच्या सर्व अटी व शर्ती लागू राहतील.

8) पुनर्नोदणीच्या प्रक्रियेतून झालेला प्रवेश पुढील तीन शैक्षणिक वर्ष (प्रवेश घेतलेले वर्ष धरुन) वैध राहील.

पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांकरिता :-

9) बी.ए./बी.कॉम. शिक्षणक्रमाच्या तीन्ही वर्षाची प्रवेश प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. परंतु परीक्षेस अनुपस्थित /अनुत्तीर्ण असल्याने शिक्षणक्रम यशस्वीपणे पूर्ण झालेला नाही आणि शिक्षणक्रमाचा कालावधी संपलेला आहे. अशा विद्यार्थ्यांनी पुनर्नोदणी शुल्क भरल्यानंतर पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्याप्रमाणे ऑनलाईन पद्धतीने परीक्षा अर्ज भरावयाचा आहे. सदर परीक्षा अर्ज परीक्षा विभागाने जाहीर केलेल्या त्या त्या परीक्षेसाठीच्या विहित मुदतीत भरावयाचा आहे. पुनर्परीक्षा अर्जास परीक्षा शुल्क, परीक्षा अर्ज सादर करण्याची मुदत इत्यादी परीक्षा विषयक बाबी इतर पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्याप्रमाणेच लागू राहतील. या पुनर्नोदणीच्या प्रक्रियेतून आलेल्या विद्यार्थ्यांचा पुनर्परीक्षा कालावधी पुनर्परीक्षा शुल्क भरलेले ती परीक्षा धरून पुढील दोन वर्ष वैध राहील.

10) सदर पुनर्नोदणी प्रक्रिया बी.ए (2000 Pattern) आणि बी. कॉम. (इंग्रजी व मराठी माध्यम) (2007 Pattern) या दोन्ही शिक्षणक्रमाचा आठ वर्षाचा कालावधी संपुष्टात आलेल्या विद्यार्थ्यांसाठी हे दोन्ही शिक्षणक्रम आणि त्यांचे Pattern नियमित विद्यार्थ्यांसाठी सुरु असेपर्यत अस्तित्वात राहील.

11) यु.जी.सी.च्या धोरणानुसार या शिक्षणक्रमाच्या नियमित विद्यार्थ्यांसाठीचे प्रवेश आणि परीक्षा नियमातील भविष्यातील बदल/अटी पुनर्नोदणी केलेल्या विद्यार्थ्यांसाठी लागू राहील.

(मनोज घंटे)
उपकुलसचिव, नोंदणी कक्ष

(प्रा. प्रकाश देशमुख)
संचालक विद्यार्थी सेवा विभाग

प्रत – 1) मा. कुलगुरू कार्यालय यांना माहितीसाठी सविनय सादर
2) मा. प्र-कुलगुरू कार्यालय यांना माहितीसाठी सविनय सादर
3) मा. कुलसचिव

प्रति,

1) सर्व वरिष्ठ शैक्षणिक सल्लागार, विभागीय केंद्रे – यांनी सदरचे सूचनापत्रक आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व बी.ए (2000 Pattern) आणि बी.कॉम. (इंग्रजी व मराठी माध्यम) (2007 Pattern) अभ्यासकेंद्रांच्या निदर्शनास आणून द्यावे.
2) मा. संचालक, मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
3) मा. संचालक, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा
4) मा. परीक्षा नियंत्रक कार्यालय
5) एम.के.सी.एल.